I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S. (पोलीस ठाणे):** इचलकरंजी **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0393 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/09/2026 03:21 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 21/09/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 21/09/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 16:18 तास **Time To (वेळेपर्यंत):** 18:13 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 21/09/2026 **Time (वेळ):** 19:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 004 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 22/09/2026 02:42 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. (a) **Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 1 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महिला व बाल विकास विभाग,बाल वि, इचलकरंजी,हातकणंगले

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): राजेंद्र अशोक सानप

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1986 (d) Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर, इचलकरंजी, कोल्हापुर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर, इचलकरंजी, कोल्हापुर, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-8208971207

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | मेनका मनोहर माने | | | 1. 47189,शिवाजीनगर,आळवे हायस्कुल जवळ,Town/Village (शहर / गाव): कोरोची,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): इचलकरंजी,District (जिल्हा): कोल्हापुर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | दिपक दिनकर कांबळे | | | 1. कोल्हापूर नाका,Town/Village (शहर / गाव): इचलकरंजी,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): इचलकरंजी,District (जिल्हा): कोल्हापुर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दिनांक - 21/09/2026

मी राजेंद्र अशोक सानप वय 40 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8208971207 समक्ष इचलकरंजी पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 21/09/2026 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना मला वैष्णवी पाटील, पोलीस उपअधीक्षक ला.प्र.वि.कोल्हापूर यांनी 10.00 वा चे सुमारास बोलावुन घेवुन, तक्रारदार किरण सुरेश जाधव. वय - 42 वर्षे, व्यवसाय - खाजगी प्रतिनिधी , रा. किल्ला भाग, मिरज जि.सांगली यांची लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगितले व त्यांचा मो.नं.9834403692 देवून त्यांना संपर्क करुन पुढील कारवाई करणेबाबतचा मुखशील आदेश आम्हास दिला. त्यावेळी आम्ही तक्रारदार जाधव यांना त्यांचे मो.नं. 9834403692 नंबरवर संपर्क केला असता त्यांनी ओंकारेश्वर मंदीर ,येड्राव येथील समोरील मोकळया जागेत भेटतो असे सांगितले.त्यानंतर आम्ही मा. कार्यकारी अभियंता, दुधगंगा कालवे विभाग क्र.1 कोल्हापूर यांचे कार्यालयातुन लेखी रिपोर्टने दोन शासकीय पंच बोलावुन घेतले. शासकीय पंच आलेनंतर आम्ही कार्यालयातील सापळा पथकातील अमंलदार पोहेकाॅ/संगिता गावडे, पोहेकाॅ/संदिप काशिद, पोहेकाॅ/सुधीर पाटील, पोकाॅ/कृष्णा पाटील, पोकाॅ/वैभव खोत यांना बोलावुन घेतले.त्यानंतर आम्ही त्यांना पंच व सापळा पथकासह शासकीय वाहनाने अॅन्टी करप्शन आॅफीस कोल्हापूर येथून निघून 13.00 वा.सुमारास निघून ओंकारेश्वर मंदीर येड्राव येथील समोरील मोकळया जागेत पोहचलो त्यानंतर थोडयावेळाने तेथे तक्रारदार श्री किरण सुरेश जाधव. वय - 42 वर्षे, व्यवसाय - खाजगी प्रतिनिधी , रा. किल्ला भाग, मिरज जि.सांगली हे भेटले व त्यांना आम्ही त्यांची तक्रार विचारली असता, त्यांनी तक्रारीची हकिकत सांगितली की, मी वरील ठिकाणी राहणेस असून जयसदगुरु महिला बचतगट,इचलकरंजी येथील बचत गटाचा प्रतिनिधी असुन बालकल्याण विभागा मार्फत राबवल्या जाणा-या अंगणवाडी आहार पुरवठा व शासकिय कामाचे अर्तगत बचत गटाचे कामकाज सुरळीत चालवण्या साठी मला अधिकृत प्रतिनिधी म्हणुन नेमलेले आहे. सदर बचत गटाअंतर्गत एकुण 06 अंगणवाडया असुन त्यांचे शालेय पोषण आहाराचे मागील सहा महिन्याचे थकित बिल मंजूर करून घेण्याकरिता बालकल्याण विभाग इचलकरंजी येथे मागील 15 दिवसापुर्वी गेलो असता तेथील मेनका कोरवी मॅडम यांनी मला सांगितले की, माझेकडे असलेल्या 20 अंगणवाडया पैकी 11 अंगणवाडया माझे कार्यक्षेत्रात असुन प्रत्येक अंगणवाडीचे प्रति महिना 500 रूपये प्रमाणे मला मागिल सहा महिन्याचे 33,000/- रूपयांची मागणी केली आहे. त्यापैकी जयसदगुरु बचत गटाच्या 06 अंगणवाडया आहेत व दिक्षाभूमी बचत गट यांच्या 05 अंगणवाडया आहेत. तुम्ही दोन्ही बचत गटाचे मिळून 33,000/-रूपये दिल्याशिवाय तुमचे बिल निघणार नाही असे मला सांगितले आहे. त्यावेळी मी त्यांना पैशाची जुळणा झाली की तुम्हाला येवुन भेटतो असे सांगुन निघुन आलो होतो.

बाल विकास प्रकल्प अधिकारी बालकल्याण विभाग इचलकरंजी येथील मेनका कोरवी मॅडम या माझेकडे बालकल्याण विभागा मार्फत राबवल्या जाणा-या 11 अंगणवाडी यांचा आहार

पुरवठा केलेचे बिल काढण्यासाठी प्रत्येक अंगणवाडीचे प्रति महिना पाचशे रूपये प्रमाणे मला मागिल सहा महिन्याचे 33,000/- रूपये लाचेची मागणी केली आहे. माझेकडे मागणी करीत असलेले 33,000/- रूपये रक्कम ही लाच म्हणुन मागणी करीत असलेची माझी खात्री झाली आहे. परंतु मला त्यांना लाच रक्कम देणेची इच्छा नाही. माझे व बाल विकास प्रकल्प अधिकारी बालकल्याण विभाग इचलकरंजी येथील मेनका कोरवी मॅडम यांचे कोणतेही देवाण - घेवाणीचे व्यवहार नाहीत व त्यांचेशी माझा कोणताही वाद नाही. मी आज दिनांक 21/09/2026 रोजी बाल विकास प्रकल्प अधिकारी बालकल्याण विभाग इचलकरंजी येथील मेनका कोरवी मॅडम यांना त्यांचे कार्यालय इचलकरंजी येथे भेटणेस जाणार असुन त्यांचेवर आपणाकडुन कारवाई व्हावी ही विनंती वगैरे मजकुरची तक्रार असल्याचे सांगून मी दिनांक 21/09/2026 रोजी कोरवी मॅडम यांची महिला व बाल विकास विभाग,बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय,कोल्हापूर, इचलकरंजी येथे त्यांचे कार्यालयात भेट घेणेस जाणार असलेचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार जाधव यांची पंचाशी व सापळा पथकातील अमंलदार यांचेषी ओळख करुन दिली. माझे सुचनेवरून तक्रारदार जाधव यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली. जाधव यांनी तोंडी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. त्यावेळी मी पुढील कारवाई ओंकारेश्वर मंदीर येड्राव येथील समोरील मोकळया जागेतून करण्याचे आहे असे सांगुन, तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार जाधव व पंच नं.01 भिकाजी जांभळे यांचेसह सर्वप्रथम महिला व बाल विकास विभाग,बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय,इचलकरंजी येथील मेनका कोरवी हया तक्रारदार यांचेकडे लाच मागणी करतात, अगर कसे याची पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. शासकीय डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर काढून त्यामध्ये ैाछक्प्ैज्ञ कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकाॅर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार जाधव व पंचाची खात्री करून दिली. डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर पडताळणीचे अनुषंगाने तक्रारदार जाधव व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यांनतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकाॅर्डर 14.12 वाजता चालु करून, तो तक्रारदार जाधव यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन, जाधव व पंच नं.1 भिकाजी जांभळे यांना तक्रारदार यांची मोटार सायकल नं. एम.एच. 10 बी.एन.8106 वरून महिला व बाल विकास विभाग,बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय,इचलकरंजी कोल्हापूर येथील मेनका कोरवी मॅडम यांची भेट घेणेकरीता पाठविले. त्यावेळी आम्ही,सापळा पथक व पंच नं.02 महेश माने असे सदर ठिकाणी थांबुन राहीलो. तक्रारदार जाधव व पंच नं.1 भिकाजी जांभळे असे काहीवेळाने ओंकारेश्वर मंदीर येड्राव येथील समोरील मोकळया जागेत आम्ही थांबलो असलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकाॅर्डर 14.58 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.1 भिकाजी जांभळे यांना तुम्ही तक्रारदार य महिला व बाल विकास विभाग,बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय,कोल्हापूर, इचलकरंजी येथील मेनका कोरवी मॅडम यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले, याबाबत विचारले असता, पंच जांभळे यांनी ते तक्रारदार यांचेसोबत महिला व बाल विकास विभाग,बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, इचलकरंजी कोल्हापूर येथील कार्यालयात गेले त्यावेळी तक्रारदार यांची कोरवी मॅडम यांची

भेट झाली नाही त्यावेळी सदर ठिकाणी असलेल्या महिला यांना मेनका मॅडम आल्या काय, असे विचारले असता सदर ठिकाणी असणा-या मॅडम यांनी, मिटींगला गेल्यात असे सांगितले. त्यानंतर सदर महिला यांचेत व तक्रारदार यांचेत बिलाचे कामाचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यावेळी तक्रारदार यांनी मेनका मॅडम किती वाजता येतील काय असे विचारले त्यावेळी सदर महिला यांनी मेनका मॅडम यांना फोन करा असे सांगितल्याने तक्रारदार यांनी मेनका मॅडम यांना फोन केला असता त्यांनी तो उचलला नाही. त्यावेळी सदर महिलने मिटींग चालू असल्याचे सांगितले. त्यानंतर मेनका मॅडम यांचा तक्रारदार यांना फोन आला असता तक्रारदार यांनी मेनका मॅडम आलतो आॅफिसला असे बोलले त्यावेळी कोरवी मॅडम यांनी सर अचानक मला दुसरी एक मिटींग होती मी तिकड आले आता एक तासाभरात येते की, असे बोलल्या त्यावेळी तक्रारदार चालतय चालतय, असे बोलून मी व तक्रारदार असे आम्ही परत आल्याचे सांगितले.

त्यानंतर पुन्हा तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार जाधव व पंच नं.01 भिकाजी जांभळे यांचेसह सर्वप्रथम महिला व बाल विकास विभाग,बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय,इचलकरंजी येथील मेनका कोरवी हया तक्रारदार यांचेकडे लाच मागणी करतात, अगर कसे याची पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. शासकीय डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे ध्वनिमुद्रीत संभाषणाच्या 02 फाईल असल्याची तक्रारदार जाधव व पंचाची खात्री करून दिली. डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यांनतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकाॅर्डर 15.16 वाजता चालु करून, तो तक्रारदार जाधव यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन, जाधव व पंच नं.1 भिकाजी जांभळे यांना तक्रारदार यांची मोटार सायकल नं. एम.एच. 10 बी.एन.8106 वरून महिला व बाल विकास विभाग,बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय,कोल्हापूर, इचलकरंजी येथील मेनका कोरवी मॅडम यांची भेट घेणेकरीता पाठविले. त्यावेळी आम्ही,सापळा पथक व पंच नं.02 महेश माने असे सदर ठिकाणी थांबुन राहीलो. तक्रारदार जाधव व पंच नं.1 भिकाजी जांभळे असे काहीवेळाने ओंकारेश्वर मंदीर येड्राव येथील समोरील मोकळया जागेत आम्ही थांबलो असलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकाॅर्डर 16.03 वाजता बंद केला.त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.1 भिकाजी जांभळे यांना तुम्ही तक्रारदार य महिला व बाल विकास विभाग,बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय,कोल्हापूर, इचलकरंजी येथील मेनका कोरवी मॅडम यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले, याबाबत विचारले असता, पंच जांभळे यांनी ते तक्रारदार यांचेसोबत महिला व बाल विकास विभाग,बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, इचलकरंजी ,कोल्हापूर,येथील कार्यालयात गेले त्यावेळी सदर ठिकाणी असणा-या अनोळखी महिलेने 'लावला मॅडमला फोन 'असे विचारले त्यावेळी तक्रारदार हे मॅडमचाच आलता फोन मगाशी एक तासाभरात येतो म्हणाले या म्हणाले असे सांगितले त्यावेळी तक्रारदार यांना मेनका कोरवी मॅडमचा फोन आल्याने तक्रारदार यांनी सदर फोन स्पीकर फोन मोडवर ठेवून उचलला त्यावेळी तक्रारदार हॅलो, असे बोलले त्यावर मेनका कोरवी मॅडम 'हा सर येतोय' असे बोलल्या त्यावर तक्रारदार हा 'मेनका मॅडम मी आलोय आॅफिसला' असे बोलले त्यावर मेनका कोरवी मॅडम 'हा मी जिना चढत होते बर बर' त्यावर तक्रारदार 'हा या या' असे बोलले त्यानंतर केरवी मॅडम हया कार्यालयात आल्या व तक्रारदार यांना, काय म्हणताय सर, असे बोलल्या त्यावर तक्रारदार' एकच मिनीट हा मॅडम गुड मार्निंग मेनका मॅडम' असे बोलले त्यावर कोरवी मॅडम

यांनी माझेकडे पाहून तक्रारदार यांना 'हे कोण हाईत'असे विचारले त्यावर तक्रारदार यांनी ' हे जोडीदार हाईत काय विषय मी आता सगळ कॅलक्युलेशन केलेल हाय, आता ते माझ आता मागच्या सहा महिन्यात जे बिल हाय, ते निघणार हाय दोन लाख चैषष्ठ हजार च्या आसपास बरोबर आणि ऐका मी आता काम सोडणार हाय' असे म्हणाले त्यावर कोरवी मॅडम,हुं..असे म्हणाल्या त्यावेळी तक्रारदार व कोरवी मॅडम यांचेमध्ये कामाचे अनुषंगाने बोलणे झाले त्यामध्ये तक्रारदार यांनी तुमची सगळी मागची विषय हाईत ती क्लिअर करून एक तारेखेपासुन मी नाही हाय असे बोलले त्यावेळी कोरवी मॅडम 'हं.' तुम्ही का काम सोडालाय' असे बोलल्या त्यावेळी तक्रारदार व कोरवी मॅडम यांचेमध्ये मुंबईला जाण्याचे अनुषंगाने बोलणे झाले त्यावेळी तक्रारदार हे "आता दोन लाख चैषष्ट हजार ते तीन लाखापर्यंत बिल निघतय"असे बोलले त्यावर मेनका कोरवी मॅडम 'हं'.असे बोलल्या त्यावर तक्रारदार"'तुमच्याकड आता आमचे 11 बचत गट आहेत"असे बोलले त्यावर मेनका कोरवी मॅडम,हं... असे बोलल्या त्यावर तक्रारदार' तर आता आपल बिल निघणार हाय ते सहा महिण्याच निघणार हाय, सहा महिन्याच हिशेब केला तर ते तेतीस हजार काय तर अमाऊंट होतीया' असे बोलले त्यावर मेनका कोरवी मॅडम हं...असे बोलल्या त्यावर तक्रारदार,'आता तेतीस हजार अमाउंट जी होतीया, त्यामध्ये काय तुम्ही डिस्काउंट तुम्ही देताय का काय क्लियर करू'असे बोलले त्यावर मेनका कोरवी मॅडम,'क्लियर करा की, कसला कुटला डिस्काउंट, तसल काय करू नका ' असे बोलल्या त्यावर तक्रारदार ' तेतीस हजार च्या तेतीस हजार देवुन
□मी काय करतो, क्लियर करतो विषय तुमचा, आता आज गणपती हाय गणपती संपल्यानंतर जाणार हाय मी आता, मग तुम्हाला कस करून देवु पेमेंट'? असे बोलले त्यावर मेनका कोरवी मॅडम,'आॅनलाईन वगैरे काय नाही कॅश घुवन या असे बोलल्या त्यावर तक्रारदार कॅश असे बोलले त्यावर मेनका कोरवी मॅडम हं... असे बोलल्या त्यावर तक्रारदार आज घेवुन येवु का उदया घेवुन येवु असे बोलले त्यावर मेनका कोरवी मॅडम 'आता किती वाजेपर्यंत घेवुन येणार हाय' असे विचारले त्यावेळी तक्रारदार आता चार वाजलेत, मला एक तासभर तरी लागेल असे बोलले त्यावेळी मेनका कोरवी मॅडम,'चालेल की या की मी थांबते,' असे बोलले त्यावर तक्रारदार यांनी'मग कॅश घेवुन येवु'असे विचारले असता कोरवी मॅडम ह्या 'बर.'असे बोलल्या त्यानंतर तक्रारदार व कोरवी मॅडम यांचेमध्ये पैसे कमी करण्याचे अनुषंगाने बोलणे होऊन त्यामध्ये तक्रारदार म्हणाले की,'सहा पर्यत असताय काय, मी लगी फोनवर बोलुन घेतो, बोलुन घेवुन विषय मोडुन आणुन देतो मग पेमेंट, काय बघा कमी काय करताय का'? असे विचारले त्यावर मेनका कोरवी मॅडम,' काय करायच तुम्ही सांगा काय करू' असे म्हणाल्या त्यावर तक्रारदार यांनी तुम्ही सांगा असे विचारले त्यावर मेनका कोरवी मॅडम,'आता तुम्ही वरून तेवढे घ्या, तीस मला दया 'असे बोलल्या त्यावर तक्रारदार 'तीस हजार देवु"?असे म्हणाले त्यावर कोरवी मॅडम,'दया, आणि तीन घ्या तुम्हाला असे म्हणाले"त्यावर तक्रारदार ,येतो चला, असे म्हणाले मी फोन करतो तुम्हाला, असे बोलून मी व तक्रारदार असे आपण थांबले ठिकाणी परत आलो अशी हकिगत सांगितली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार जाधव यांना विचारले असता त्यांनी पंच नं. 01 भिकाजी जांभळे यांनी सांगितले प्रमाणेच हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही डिजिटल व्हाईस रेका ॅर्डरमधील तक्रारदार जाधव व महिला व बाल विकास विभाग,बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय,इचलकरंजी, कोल्हापूर येथील मेनका कोरवी मॅडम यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण

दोन्ही पंच व तक्रारदार यांचेसमक्ष ऐकले. यावरून तक्रारदार जाधव व मेनका कोरवी मॅडम यांची भेट होवुन त्यांच्यामध्ये तक्रारदार यांना बालकल्याण विभागामार्फत राबवल्या जाणा-या 11 अंगणवाडी यांचा आहार पुरवठा केलेचे बिल काढण्यासाठी तक्रारदार जाधव यांचेकडे तडजोडीअंती 30,000/- रूपये मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आम्ही महिला व बाल विकास विभाग,बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय,इचलकरंजी यांचे लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई सुरू केली.

सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही सर्वांना सुचना दिल्या. त्यानंतर मी तक्रारदार जाधव यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- दराच्या 60 चलनी नोटा असे 30,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार जाधव व पंचाना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व, संपुर्ण कार्यवाही, तसेच त्याअनुषंगाने तक्रारदार जाधव व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर अं ॅथ्रासिन लावलेले 30,000/- रूपये तक्रारदार यांचे पॅन्टचे उजवे बाजुचे पुढील खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार जाधव , दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. तसेच तक्रारदार यांना कोरवी मॅडम यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांनी त्यांचे हातरूमाल तोडांवरून फिरवण्याचा आहे हा पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले. त्यानंतर व्हाईस रेकाॅर्डर 17.01 वाजता सुरू करून, तो तक्रारदार जाधव यांचे शर्टचे आतमध्ये काळे दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार जाधव व पंच नं.1 भिकाजी जांभळे असे त्यांचे मोटर सायकलने महिला व बाल विकास विभाग,बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय,इचलकरंजी येथील मेनका कोरवी यांची भेट घेणेकरीता पाठविले. त्यावेळी त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.2 महेश माने असे शासकीय वाहनामधून तक्रारदार यांचे पाठोपाठ नगरपरिषद शाॅपींग सेंटर इमारत इचलकंरजी इमारती मधील तिस-या मजल्यावरील महिला व बाल विकास विभाग,बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, इचलकरंजी कार्यालयाचे पोर्च व जिन्यालगत आम्ही आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. काहीवेळाने तक्रारदार जाधव हे कार्यालयाचे बाहेर येवून त्यांनी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता मी, पंच नं.02 महेश माने व स्टाफ तेथे गेलो त्यावेळी पंच नं.1 भिकाजी जांभळे यांनी कोरवी मॅडम यांनी त्यांचे टेबल जवळ असले इसमाकडे तक्रारदार यांना पैसे देण्यास सांगितल्याने तक्रारदार यांनी सदर इसमाकडे पैसे दिले असून सदर इसम पैसे घेवून कार्यालयाचे बाहेर गेला असल्याचे सांगिल्याने आम्ही सापळा पथकातील पोहेका ॅ/संदिप काशिद,पोहेकाॅ/सुधीर पाटील,पोेकाॅ/कृष्णा पाटील यांना लगेच सदर इसमाचा पाठोपाठ जाणेस सांगितले व आम्ही व मपोहेकाॅ/गावडे व पंच असे सदर ठिकाणी थांबून राहीलो थोडयावेळाने शोध पथक हे एका अनोळखी इसमासह कार्यालयात परत आले. त्यावेळी पंच यांनी हाच तो इसम असून ज्याचेकडे कोरवी मॅडम यांचे सांगणेप्रमाणे तक्रारदार यांनी पैसे दिले असून त्यांनी लाच रक्कम स्विकारून त्यांचे पॅन्टचे उजव्या बाजुचे खिशात ठेवलेली होती ती लाच रक्कम त्यांनी त्यांचे हाताने काढुन आम्हा व पंचासमक्ष दाखविली त्यावेळी आम्ही सदर लाच रक्कम लागलीच दोन्ही पंचाकरवी ताब्यात घेतली व त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव दिपक दिनकर कांबळे वय.49 व्यवसाय-ठेकेदार रा.फ्लॅट नं.1,कोळेकर बिल्डींग, कोळेकर यांचे घरी भाडयाने कोल्हापूर नाका,इचलकरंजी असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार जाधव यांचेकडील व्हाईस

रेकॉर्डर 17.25 वाजता बंद केला. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या त्यावेळी दिपक कांबळे यांचे उजवे हाताचे बोटाना व तळ हातास तसेच कांबळे यांनी लाच रक्कम स्विकारून त्यांचे पॅन्टचे उजव्या बाजुचे खिशात ठेवली होती त्या खिशात व खिशांचे कडास अंथ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. सदर सापळा ठिकाणचे व्हिडीओ शुटींग आमचे सुचनेवरून सापळा पथकातील अमंलदार यांनी केलेले आहे. सापळा कारवाईवेळी काय हकीकत घडली असे पंच नं.01 भिकाजी जांभळे यांना विचारले असता, त्यांनी सांगितले की, ते व तक्रारदार हे कोरवी मॅडम यांना त्यांचे कार्यालयात भेटले. त्यावेळी त्यांचेत व कोरवी मॅडम यांच्याकडे पैसे देण्याचे अनुषंगाने बोलने झाले.त्यावेळी माने-कोरवी मॅडम,तक्रारदार यांना पाहून' या सर घेवुन आला' असे विचारले त्यावेळी तक्रारदार हुं.. असे बोलले त्यावर कोरवी मॅडम 'इथुनच घेवुन आलाय' असे विचारले त्यावर तक्रारादार इथुनच... असे बोलले त्यावेळी कोरवी मॅडम' माझे नावावर तुम्ही तेतीसच करा तुम्ही बाकी मधला हिशोब काय कोणाला सांगत बसु नका हां....' अशा बोलल्या त्यावर तक्रारदार, हां.....ठिक हाय असे बोलले त्यावर कोरवी मॅडम 'चालतय' अशा बोलून त्यांनी अनोळखी इसमाकडे बोट दाखविले त्यावेळी तक्रारदार यांनी, कोण असे विचारले त्यावेळी कोरवी मॅडम यांनी 'आपलेच आहेत... दिपक... दिपक एक दोन मिनट येता. दया तेच्याकड' असे बोलल्या त्यावर तक्रारदार चालतय,असे बोलले त्यावर सदर ठिकाणी कोरवी मॅडम यांनी इशा-याने दिपक यांना बोलविले त्यावेळी त्यांनी आं... असे विचारले त्यावर कोरवी मॅडम ,'हे घेवुन जावा एक मिनिट' असे बोलुन तक्रारदार यांचेकडील पैसे घेऊन जाणेस सांगितले त्यावेळी खाजगी इसम दिपक यांनी, 'ठिक हाय' असे बोलले त्यावर तक्रारदार 'देवु हित मॅडम, मॅडम हितच देवु ना' असे विचारले त्यावेळी कोरवी मॅडम यांनी,'दया की दया , काय प्रॉब्लेम नाही ' असे बोलल्या त्यावर तक्रारदार,'तीस हजार हाईत मोजुन घ्या...'.असे बोलून तक्रारदार यांनी त्यांचे कडील लाच रक्कम दिपक कांबळे, यांचेकडे दिली असता त्यांनी 'राहुदे ...'असे बोलून त्यांनी तक्रारदार यांचेकडून स्विकालेली लाच रक्कम त्यांचे पॅन्टचे खिशामध्ये ठेवून ते बाहेर निघून गेले.त्यानंतर तक्रारदार जाधव यांनी कोरवी मॅडम यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतरचा नियोजीत इशारा केला असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारले असता त्यांनी पंच भिकाजी जांभळे यांचे हकीकतशी मिळती जुळती हकीकत सांगितली. त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही गावभाग पोलीस स्टेशन येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार किरण जाधव यांना त्यांचे बालकल्याण विभागा मार्फत राबवल्या जाणा-या 11 अंगणवाडी यांचा आहार पुरवठा केलेचे थकित बिल काढण्यासाठी महिला व बाल विकास विभाग,बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय,इचलकरंजी येथील मेनका कोरवी त्यांनी तक्रारदार जाधव यांचेकडे स्वतः:करीता बेकायदेशीरपणे तडजोडीअंती 30,000/- रूपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम आरोपी खाजगी इसम दिपक कांबळे यांचेकडे देण्यास सांगून आरोपी खाजगी इसम दिपक कांबळे यांनी सदरची रक्कम लाचेची असल्याची माहिती असून देखील त्यास स्पष्ट सहमती दर्शवून मेनका कोरवी मॅडम यांचेकरीता तक्रारदार यांचेकडुन 30,000/-रूपये लाच रक्कम बेकायदेशीरपणे व अप्रामाणिकपणे स्विकारताना दिपक कांबळे यांना आम्ही व सापळा पथकाने पकडले आहे. म्हणुन माझी आरोपी लोकसेविका मेनका मनोहर माने-कोरवी, वय - 44 वर्षे, पद - मुख्य सेविका, महिला व बाल विकास विभाग,बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय,

इचलकरंजी कार्यालय, रा.प्लाॅट नं.47189 शिवाजीनगर,आळवे हायस्कुल जवळ,कोरोची ता.हातकणंगले जि.कोल्हापूर 2) खाजगी इसम दिपक दिनकर कांबळे वय.49 व्यवसाय-ठेकेदार रा.फ्लॅट नं.1,कोळेकर बिल्डींग, कोळेकर यांचे घरी भाडयाने कोल्हापूर नाका,इचलकरंजी यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 चे कलम 7,7-अ प्रमाणे माझी फिर्याद आहे.

समक्ष हा दिला जबाब स. ता. म.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1) Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा):**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा): पोलीस हवालदार**
RAJARAM SHIVAJI PATIL

**No. (क्र.):** PSMH26930 **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

**(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

ठाणे अंमलदार

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**